**निविदा क्र.**
**पुजा साहित्य/ इतर व्यवसाय**

# श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर)
# ता.नेवासा, जि.अहिल्यानगर

श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा यांच्या मालकीच्या मौजे शिंगणापूर गट नं.२६० मधील व्यापारी संकुलातील गाळे पुजा साहित्य विक्री व इतर व्यवसायासाठी दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या अकरा महीन्याच्या कालावधीसाठी परवाना पध्दतीने अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास देणे करिता...

## निविदा अर्ज

श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा यांच्या मालकिच्या मौजे शिंगणापूर गट नं.२६० मधील व्यापारी संकुलातील गाळे पुजा साहित्य विक्री व इतर व्यवसायासाठी दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या अकरा महीन्याच्या कालावधीसाठी परवाना पध्दतीने अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास देणे बाबत अटी व शर्ती खालील प्रमाणे असे....

**निविदा वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | निविदा घोषणा दिनांक व वेळ | १८.०७.२०२६ सकाळी १०.०० वा. |
| २ | निविदा दस्तऐवज मिळविण्याची अंतिम दिनांक व वेळ | २७.०७.२०२६ सायं.०५.०० वा. |
| ३ | निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक व वेळ | २७.०७.२०२६ सायं.०५.०० वा. |
| ४ | तांत्रिक लिफाफा उघडण्याची दिनांक व वेळ | २८.०७.२०२६ सकाळी १०.०० वा. |
| ५ | आर्थिक लिफाफा उघडण्याची दिनांक व वेळ | २८.०७.२०२६ सकाळी ११.०० वा. |

**A.लिफाफा क्रमांक १ : तांत्रिक लिफाफा**

१. निविदाधारकाने मतदान ओळखपत्र/आधारकार्ड / ड्राईव्हींग लायसेन्स या पैकी एकाची झेरॉक्स प्रत जमा करणे अनिवार्य राहील.

२. निविदाधारकाने अद्यावत दुकान नोंदणी दाखला (शॉप अॅक्ट) / उद्यम आधार परवाना विहित मुदतीत सादर करणे बाबत बंधपत्र जमा करणे अनिवार्य राहील.

३. पॅन कार्ड जमा करणे अनिवार्य राहील.

४. निविदा अर्जाची रक्कम व बयाणा रक्कम भरलेल्या पावतीची सत्य प्रत निविदा अर्जा सोबत तांत्रिक लिफाफ्यात न जोडल्यास संबधित निविदा धारकाची निविदा अपात्र ठरविण्यात येईल याची निविदाधारकाने नोंद घ्यावी.

५. लिफाफा क्र.१ तांत्रिक लिफाफा सादर करताना सीलबंद पाकिटावर ज्या व्यवसाया करिता निविदा अर्ज भरावयाचा आहे त्या व्यवसायाचे नाव,गाळा नंबर, स्वत:चे संपुर्ण नाव, पत्ता व फोन, मोबाइल नंबर, इ.माहीती स्पष्टपणे नमूद करावे.

६. लिफाफा क्र.१ मधील तांत्रिक निविदे मध्ये पात्र झालेल्या निविदा धारकांच्याच लिफाफा क्र.२ मधील दरा संबधिच्या निविदा उघडण्यात येतील.

७. निविदा अर्जातील परिशिष्ठ "अ" (निविदा धारकाबाबतची माहिती), परिशिष्ठ "ब " (तांत्रिक निविदेमधील कागदपत्रे) (चेक लिस्ट), परिशिष्ठ "ड" (स्वयंघोषणा पत्र), परिशिष्ठ "इ" (श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे बंधपत्र) , परिशिष्ठ "ई" (शनिदेवावर पूर्ण श्रद्धा,भक्ती आणि आस्था असल्याचे हमीपत्र) बाबतचे सर्व प्रपत्र तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये सादर करणे अनिवार्य आहे.

८. जाहिरात प्रसिध्द केल्या पासून कोरे निविदा अर्ज देवस्थान कार्यालयात कार्यालयीन वेळेत रोख रक्कम भरणा करून मिळतील अथवा देवस्थानचे संकेत स्थळ www.shanidev.com. येथून डाऊन लोड करता येतील.निविदा अर्जाची किंमत रू.१५००.०० (एक हजार पाचशे रूपये मात्र) जीएसटी सह विनापरतावा आहे. रोख स्वरुपात सदर निविदा अर्ज देवस्थानचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत सूटी खेरीज लेखा विभागात मिळतील. अथवा शनैश्वर देवस्थान शनि शिंगणापूर शाखा सोनई येथील खाते क्र.६०५५१८७२०३५ (IFSC Code MAHB0001391) वर RTGS /NEFT/online द्वारे जमा करावी त्याची पावतीची सत्य प्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अनिवार्य राहील. बयाणा रक्कम पूजा साहित्य व इतर व्यवसाय गाळा नं. ४ व ६ साठी रूपये ५०,०००.०० (अक्षरी रूपये पन्नास हजार मात्र) , गाळा नं.१५ साठी रूपये ५,००,०००.०० (अक्षरी रूपये पाच लाख मात्र) , गाळा नं.३४ साठी रूपये २,५०,०००.०० (अक्षरी रूपये दोन लाख पन्नास हजार मात्र) फक्त राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्ट(DD) व्दारे shri shanishwar Devasthan या नावानेच अथवा महाराष्ट्र बँक शाखा सोनई येथील खाते क्र.६०५५१८७२०३५ (IFSC Code MAHB0001391) मध्ये RTGS /NEFT/online द्वारे जमा करावी व सदरच्या पावतीची सत्य प्रत निविदा अर्जासोबत तांत्रिक लिफाफ्यात सादर करणे अनिवार्य राहील.

**B.लिफाफा क्र २ – दरा संबंधीचा लिफाफा**

१.निविदाधारकाने (परिशिष्ठ "क") दरासंबंधीचे प्रपत्र व मुख्य निविदा अर्जाच्या सर्व पानावर स्वत: स्वाक्षरी करून लिफाफा क्र.२ मध्ये सीलबंद सादर करावे.

२.लिफाफा क्र.२ दरा संबंधीचा लिफाफा सादर करताना सीलबंद पाकिटावर ज्या व्यवसाया करिता निविदा अर्ज भरावयाचा आहे त्या व्यवसायाचे नाव,गाळा नंबर, स्वत:चे संपुर्ण नाव, पत्ता व फोन, मोबाइल नंबर, इ.माहीती स्पष्टपणे नमूद करावे.

**C. निविदाधारकांसाठी सूचना –**

१. निविदा धारकांना निविदा अर्ज दि.१८.०७.२०२६ ते दि.२७.०७.२०२६ सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत देवस्थानचे लेखा विभागात कार्यालयीन वेळेत विकत घेता येतील. अथवा देवस्थानचे संकेत स्थळ www.shanidev.com. येथून डाऊनलोड करता येतील.

२. सिलबंद निविदा दि.२७.०७.२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वा. पर्यंत संगणक विभाग, प्रशासकीय कार्यालय येथे स्विकारण्यात येतील.वेळेत न येणाऱ्या निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

३. देवस्थान कार्यालयात वर नमुद तारखेस व वेळेत जमा झालेल्या तांत्रिक लिफाफा दिनांक २८.०७.२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. उघडण्यात येतील. त्याच दिवशी आर्थिक/दरा बाबतचा लिफाफा सकाळी ११.०० वा.उघडण्यात येईल मात्र तांत्रिक लिफाफा बाबत प्रश्न निर्माण झाल्यास आर्थिक/दरा बाबतचा लिफाफा उघडणे बाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. या दरम्यान निविदाधारक यांना उपस्थित राहता येईल.मात्र निविदा धारक उपस्थित नसल्यास त्यांचे अनुपस्थिती मध्ये निविदा उघडण्यात येतील व नंतर या बाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

४.कोणत्याही निविदाधारकास एक किंवा अधिक निविदा अर्ज भरता येतील परंतू प्रत्येक गाळया साठी वेगवेगळे निविदा अर्ज व प्रत्येक निविदे साठी Deposit स्वतंत्र पणे भरावे लागेल. ज्या प्रत्येक ठिकाणी निविदा धारक H -1 (सर्वाधिक रकमेची बोली) असेल त्या प्रत्येक गाळ्याची रक्कम स्वतंत्रपणे भरावी लागेल. निविदाधाकास १ पेक्षा जास्त गाळया साठी निविदा सादर करता येईल आणि ज्या गाळयासाठी निविदा H-1 असेल ते मंजूर केले जातील. मात्र H-1 धारकाने नकार दिल्यास त्यांचे Deposit जप्त करण्यात येऊन H-2 व त्यापुढील निविदा धारकास H-1 याचे दरात गाळा मंजूरीची संधी देण्यात येईल.ज्या निविदा धारकाचे निविदा मान्य होणार नाही त्यांचे बयाणा रक्कम परत करण्यात येईल.

५.ज्या व्यवसाया करिता निविदा अर्ज भरावयाचा आहे त्या व्यवसायाचे नाव,गाळा नंबर, स्वत:चे संपुर्ण नाव, पत्ता व फोन, मोबाइल नंबर, बयाणा रक्कम भरल्याचा पावती नंबर इ.माहीती निविदा अर्जा मध्ये त्याच प्रमाणे सिलबंद निविदा अर्ज पाकिटावर नमूद करावी.एका पेक्षा जास्त निविदा अर्ज सादर करताना प्रत्येक निविदा अर्ज सिलबंद स्वतंत्र पणे सादर करणे आवश्यक असेल

६.आर्थिक/दरा बाबतचा लिफाफा ऊघडल्यानंतर त्याच दिवशी देवस्थानचे नोटीस बोर्डवर अथवा देवस्थानचे संकेत स्थळ www.shanidev.com. मंजूर निविदाची यादी प्रसिध्द केली जाईल. स्वतंत्र तोंडी अथवा लेखी स्वरूपात नोटीस दिली जाणार नाही.

७.मंजूर निविदा धारकाने दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या कालावधी साठी मंजूर झालेल्या निविदेची एकूण परवाना शुल्काची ( एकूण ११ महिन्यांच्या कालावधीची ) रक्कम आगाऊ भरून शासनाने निश्चित केलेल्या नुसार करारनामा करून दिल्यानंतरच प्रत्यक्ष गाळयाचा ताबा देण्यात येईल.

८.निविदा अर्ज मंजूर झाले नंतर निविदा अर्जात नमुद केल्याप्रमाणे दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या कालावधीसाठीची एकूण शुल्काची रक्कम (परवाना शुल्क) "shri shanishwar Devasthan" या नावाने डिमांड ड्राफ्ट अगर पे ऑर्डरने काढून अथवा महाराष्ट्र बँक शाखा सोनई येथील खाते क्र.६०५५१८७२०३५ (IFSC Code MAHB0001391) वर RTGS /NEFT/online द्वारे मंजूर निविदाधारकाच्या खात्यातूनच निविदाची यादी प्रसिध्द झाले पासून सात दिवसाचे आत देवस्थान कडे जमा करणे आवश्यक आहे.मुदतीत रक्कम जमा न केल्यास निविदा अर्ज रद्द समजण्यात येईल व बयाणा रक्कम जप्त केली जाईल

९.निविदा मंजूर झाल्यानंतर गाळे आहे त्या स्वरुपात ताब्यात दिले जातील.निविदा धारक यांना सदरच्या गाळ्याच्या स्वरूपात कोणताही बदल करता येणार नाही अथवा कोणतेही बांधकाम अथवा फेरबदल करता येणार नाही.करार कालावधीत देवस्थानच्या गाळयाची दुरूस्ती अगर देखभाल करण्याची बाब उद्भभवल्यास ती मंजूर निविदा धारकाने करावयाची आहे या बाबत कोणतीही आर्थिक भरपाई देवस्थान करणार नाही. गाळा नं.३४ साठी आहे त्या स्वरुपात जागा व पत्रा शेड , सुविधा उपलब्ध राहील.

१०.देवस्थानच्या व्यापारी संकुलाच्या इमारतीचे नुकसान करता येणार नाही तसे केल्यास व इमारतीचे नुकसान झाल्यास देवस्थान प्रशासन ठरवतील तेवढी रक्कम नुकसान भरपाई म्हणून ताबडतोब देवस्थानकडे भरावी लागेल.

११.मंजूर निविदाधारकास देवस्थानच्या वीज व्यवस्थेतून वीज पुरवठा केला जाईल, ज्याचे नियमानुसार बिल अदा करणे निविदाधारकास बंधनकारक राहील;मात्र कोणत्याही कारणास्तव देवस्थान सदर पुरवठा देण्यास असमर्थ ठरल्यास पर्यायी वीज सुविधा उपलब्ध करण्याची संपूर्ण जबाबदारी निविदाधारकाची असेल, तसेच गाळ्यातील वायरिंगमध्ये कोणताही अनावश्यक फेरबदल न करता इलेक्ट्रिकल साहित्याची योग्य देखभाल करणे निविदाधारकास बंधनकारक राहील आणि महावितरणकडून वीज वापराबाबत कोणतीही कायदेशीर बाब उद्भवल्यास ती निविदाधारकावर पूर्णतः बंधनकारक राहील

१२.अकरा महीन्याचा कालावधी दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ असा राहील.या कालावधीच्या आत गाळा सोडावयाचा असल्यास एक महीना अगोदर लेखी स्वरूपात अर्ज द्यावा लागेल.अशा प्रकारे मुदत पुर्व गाळा सोडल्यास अगर देवस्थानने केलेल्या कारवाईमुळे गाळा सोडावा लागल्यास सदर गाळया साठी भरलेली बयाणा रक्कम व एकूण ११ महिन्यांच्या कालावधीची शुल्काची (परवाना शुल्क) रक्कम जप्त केली जाईल या विषयी मंजूर निविदा धारक यांना कुठल्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही व अशा गाळा धारकास काळ्या यादीत सामाविष्ठ करून पुढील निविदा प्रक्रीये मध्ये पुढील ३ वर्षा करिता भाग घेता येणार नाही.

१३.मंजूर निविदा धारक यांना सदर गाळा परस्पर अन्य व्यक्तीस/संस्थेस चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतर करता येणार नाही किंवा सदर गाळया मध्ये कुठल्याही प्रकारचा पोट भाडेकरू ठेवता येणार नाही अगर त्रयस्तांचे कोणत्याही प्रकारचे वहीवाटीचे हक्क निर्माण होतील असे कुठलेही कृत्य करता येणार नाही. सदर गाळा इतरास चालविण्यास दिल्याचे अगर त्रयस्तांचे कोणत्याही प्रकारचे वहीवाटीचे हक्क निर्माण होतील असे कुठलेही कृत्य केल्याचे देवस्थानचे निदर्शनास आल्यास सदर गाळया साठी भरणा केलेली बयाणा व एकूण ११ महिन्यांच्या कालावधीची शुल्काची संपुर्ण रक्कम (परवाना शुल्क) जप्त करून गाळा खाली करून देवस्थानचे ताब्यात घेण्याचा देवस्थानला हक्क व अधिकार आहेत.

१४.करार कालावधीत दुर्दैवाने मंजूर निविदा धारक मयत झाल्यास व त्यांचे कायदेशिर वारसाने सक्षम अधिकाऱ्याचा दाखला आणून दिल्यास संमतीदर्शक वारसाचे नावे सदरचा गाळा उर्वरीत करार कालावधीसाठी हस्तांतरीत करण्यात येईल.दुर्दैवाने करारकालावधीत मंजूर निविदा धारक यांचे कुठल्याही प्रकारच्या नैसगिक अगर अनैसर्गिक आपत्तीने अथवा कोणत्याही कारणाने जिवित अथवा वित्त हानी झाल्यास त्यास देवस्थान संस्था जबाबदार राहणार नाही.

१५. मंजूर निविदाधारकाचे कोणत्याही कारणाने व कोणत्याही स्वरूपाचे नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी गाळे धारकाची असेल.आवश्यकतेनुसार निविदा धारकाने आपल्या व्यवसायाचा विमा करावा.

१६.गाळया समोरील जागेत अगर पत्राशेडच्या बाहेर कोणतेही सामान ठेवता येणार नाही व इतरत्र आवारात दुकानचे फलक लावून अतिक्रमण करता येणार नाही.याचा भंग झाल्यास सदर गाळा देवस्थानचे ताब्यात घेण्यात येईल व याकामी सुरूवातीला भरलेली दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या कालावधी साठीची एकूण ११ महिन्यांच्या कालावधीची रक्कम व बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१७.कोणत्याही गाळया संबंधी एकाच किमतीचे व एका पेक्षा अधिक व्यक्तीचे निविदा अर्ज असल्यास सदर गाळयाची चिठ्ठी टाकून निविदा मंजूर करण्यात येईल.

१८. कोणत्याही एका गाळ्यासाठी एकच निविदा अर्ज असल्यास सदर निविदा मंजूर करण्यात येईल.

१९.या व्यवसायाचे संदर्भात आवश्यक शासनाचे नियम व कायद्याचे पालन करणे तसेच यासाठी शासनाकडे योग्य त्या प्रकारच्या करांचा भरणा करणे व इतर योग्य ती संपुर्ण पुर्तता करणे तसेच व्यवसायासंबंधी आवश्यक सरकारी परवाने घेणे हि सर्व जबाबदारी मंजूर निविदा धारक यांची राहिल.

२०.मंजूर निविदाधारक यांनी कामावर ठेवावयाचे कामगारांसंबंधी बालकामगार प्रतिबंधक कायदा व इतर कामगार कायद्याचे पालन करणे बंधनकारक असेल. सदरील बाबीच्या उल्लंघना मुळे कोणतीही शासकीय कारवाई उद्भवल्यास त्याची जबाबदारी निविदाधारक यांची असेल .

२१. मंजुर निविदाधारक यांनी स्वतःचे व कामावर ठेवलेल्या कामगारांचे नाव,पत्ता व फोटो कार्यालयात जमा करणे आवश्यक असेल व याआधारे देवस्थान मार्फत ओळखपत्र देण्यात येईल ते ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे व तपासणी वेळी दाखवणे अनिवार्य असेल.

**२२.देवस्थानच्या व्यापारी संकुलनातील गाळयात पूजा साहित्य, खाद्य पदार्थ (पेयांसह:-शीतपेय,पाणी बॉटल, चहा,कॉपी,दूध ई.) अथवा भाविकांना किंवा त्यांच्या कुटुंबियांना आवश्यक असू शकतात अशा वस्तू किंवा सेवा या बाबतचे व्यवसाय करता येतील. यामध्ये साधारणपणे खालील बाबी असू शकतात.**

- पूजा साहित्य
- शुद्ध खाद्य तेल
- प्रसाद केंद्र : लाडू/पेढा/मुरमुरे/काजू अथवा स्थानिक वैशिष्ट्य असलेला प्रसाद ई.
- धार्मिक ग्रंथ आणि साहित्य
- मूर्ती आणि फोटो
- वस्त्र भांडार
- हस्तकला आणि स्मृतीचिन्हे (Souvenirs)
- स्टेशनरी साहित्य
- विविध खेळणी
- पादत्राणे
- किराणा साहित्य
- इंटरनेट व वायफाय सेवा
- कुरियर सेवा
- फळे व नारळपाणी

वरील साहित्य व सेवा व्यतिरिक्त इतर बाबी सुध्दा अनुज्ञेय असतील मात्र त्यासाठी आवश्यक विविध शासकीय परवाने प्राप्त करून घेण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

**देवस्थान मालकीचे जागेत खालील उद्योग व्यवसाय, सेवा अनुज्ञेय नसतील.**

- कोणत्याही स्वरुपाची मद्य विक्री
- जुगार /मटका तत्सम कोणताही व्यवसाय अथवा खेळ
- तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ
- भेसळयुक्त खाद्य तेल अथवा अखाद्य तेल
- इजा पोहचू शकतील अशा वस्तू, शस्त्रे,स्फोटके, ज्वलनशील पदार्थ ई.
- मांसहार व तत्सम व्यवसाय सेवा
- सदर जागा देवस्थानच्या मालकीची असल्याने, त्या ठिकाणी देवस्थानच्या धार्मिक पावित्र्यास, परंपरेस, आचारास अथवा श्रद्धेस बाधा पोहोचेल किंवा धक्का बसेल, असा कोणताही व्यवसाय अथवा सेवा देता येणार

नाही.कोणत्याही प्रकारचे अनैतिक,अधार्मिक अथवा देवस्थानच्या प्रतिमेला हाणी पोहचवणारा कोणताही व्यवसाय अथवा सेवा देता येणार नाही.

२३. देवस्थानच्या व्यापारी संकुलनातील बोर्ड/फलकावर पूजेचे साहित्य व त्याचे विक्रीचे दरपत्रक प्रसिध्द/लावलेले आहेत ते साहित्य त्याच दरात विक्री करणे मंजूर निविदा धारकावर बंधनकारक आहे. बोर्ड/फलकावर दर्शविण्यात आलेल्या दरपत्रकापेक्षा जास्त दराने भाविकांना पूजासाहित्य विक्री केल्याचे निदर्शनास आल्यास मंजूर निविदा धारकाकडून गाळा खालीकरून देवस्थानचे ताब्यात घेतला जाईल व सदर गाळया करिता मंजूर निविदा धारकाने भरलेली परवाना शुल्क व बयाणा रक्कम कुठल्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही.

२४.ज्यांच्या कडे देवस्थानचा गाळा/जागा इ.ची थकबाकी स्वत:चे नावावर किंवा त्यांचे एकत्रित कुटूंबातील घटकाचे नावे आहे त्यांना निविदा अर्ज भरता येणार नाही.

२५.मंजूर निविदा धारकाची बयाणा रक्कम दि.२८.०६.२०२७ पर्यंत बयाणा (डिपॉझिट) म्हणून ठेवून घेतली जाईल व ती देवस्थानच्या ताब्यात गाळा सुस्थितीत दिल्यानंतरच परत केली जाईल. सदर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२६.सदर व्यवसायासाठीची गाळा मिळकत ही देवस्थानचे मालकीची असुन दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या अकरा महिन्याच्या कालावधी करिता पुजा साहीत्य/इतर विक्री व्यवसायासाठी मंजूर निविदा धारक यांना परवाना पध्द्तीने वापरण्या करीता देण्यात येईल.निविदा अर्ज मंजूर झाल्यानंतर या संदर्भात करावयाचा सदरचा करारनामा हा परवाना करारनामा असून भाडे करारापेक्षा पुर्णपणे वेगळा असेल.त्यामुळे मंजूर निविदा धारक (करारनामा लिहुन देणार) यांना भाडेकरू म्हणुन कोणतेही हक्क अगर अधिकार सदर मिळकती वर कधीही प्राप्त होणार नाहीत व तसे हक्क व अधिकार मंजूर निविदा धारक (करारनामा लिहुन देणार) किंवा त्यांचे उत्तराधिकारी, हक्कदार व व्यवस्थापक यांना केव्हाही सांगता येणार नाहीत.परवाना करार कालावधी संपुष्टात येताच दि.२९.०५.२०२७ रोजी त्याच दिवशी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विना तक्रार, विना अट, कोणताही हक्क अगर अधिकार न सांगता देवस्थानच्या सदर गाळा मिळकतीचा कब्जा त्यातील लाईट फिटींगसह सुस्थितित देवस्थान संस्थेस देण्याचे मंजूर निविदा धारक यांचे वर बंधनकारक आहे. त्यासाठी देवस्थान संस्थेने मंजूर निविदा धारक यांना वेगळी नोटीस देण्याची गरज नाही. सदर गाळया चा वापर अनुज्ञेय नसलेले उद्योग व्यवसाय, सेवा तसेच कोणत्याही प्रकारचे अनैतिक,अधार्मिक अथवा देवस्थानच्या प्रतिमेला हाणी पोहचवणारा कोणताही व्यवसाय अथवा सेवा यासाठी करीत असल्याचे देवस्थान प्रशासन यांचे निदर्शनास आल्यास अगर या संदर्भात देवस्थान कार्यालयात लेखी तक्रार दाखल झाल्यास व त्यात तथ्य असल्याचे निदर्शनास आल्यास मंजूर निविदा धारक यांचे वापरातील गाळा त्यांनी देवस्थानकडे भरलेली बयाणा रक्कम व परवाना शुल्काची रक्कम जप्त करून सदर गाळा खाली करून देवस्थानचे ताब्यात घेण्याचा हक्क व अधिकार देवस्थानास असेल.

२७.मंजुर निविदा धारकास त्यांनी निविदा अर्जात नमुद केलेल्या परवाणा शुल्क रकमेवर सरकारी नियमानुसार होणारी (GST) जीएसटी १८ % कराची रक्कम अथवा अनुज्ञेय कराची रक्कम अतिरीक्त भरणा करावी लागेल.

२८.भक्तनिवास नं.२ करिता मागिल रस्ता भाविकांना पायी प्रसादालयाकडे जाण्यायेण्यासाठी खुला ठेवणे अथवा बंद करणे बाबतचा अधिकार देवस्थानला आहे.या बाबत निविदाधारकांनी नोंद घेऊनच निविदा अर्ज भरावा.

२९.कुठल्याही व्यवसायीकास रोड लगत असनाऱ्या कंम्पाऊंडवॉलचे आतील बाजुस उभे राहून कंम्पाउंड वॉल वर पुजा साहित्य ठेवून त्याची विक्री करता येणार नाही. नियमाचे उल्लंघन झाल्यास योग्य ती कारवाई देवस्थानकडुन करण्यात येईल.

३०.आरसीसी गाळया समोर गाळया पासून पुढे ८ फुट लांबीचे पत्राशेड राहिल तसेच गाळा नं.३४ समोर ४० फुट लांबीचे पत्राशेड राहिल त्याचे आतमध्येच पुजा साहित्य व स्टेशनरी इ.अनुज्ञेय व्यवसाय करावा लागेल.या नेमून दिलेल्या जागेव्यतिरीक्त इतरत्र आवारात अतिक्रमण करता येणार नाही.तसेच दुकानाचे नावाचे फलकामध्ये देवस्थानचा लोगो वापरता येणार नाही. या नियमांचा भंग झाल्यास सदर गाळा देवस्थानचे ताब्यात घेण्यात येईल व याकामी सुरूवातीला भरलेली दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या कालावधी साठीची परवाना शुल्काची रक्कम व बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

३१.भाविकांची अडवणूक होऊ नये व गाळे धारकांना समान व्यवसायाची संधी मिळावी म्हणून देवस्थान पार्किंग मध्ये येणारे वाहन अनुक्रमे गाळे धारक यांच्याकडे साहित्य खरेदी करतील मात्र कोणत्याही कारणास्तव पार्किंग बंद करावी लागल्यास त्या बाबत जबाबदारी देवस्थान यांची नसेल.

३२.सदरील गाळे हे व्यावसायिक कारणासाठी भाडे-तत्वावार परवाना करार पद्धतीने देण्यात येत आहे मात्र व्यवसायातील कोणत्याही नुकसानीची जबाबदारी हि मंजूर निविदा धारकाची असेल.

३३.धार्मिक पावित्र्य आणि आचारसंहिता: देवस्थानच्या गाळ्यात पूजा साहित्याची विक्री करणाऱ्या निविदाधारकाची आणि त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांची श्री शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असणे अनिवार्य आहे. श्री शनिदेव हे कोट्यवधी भक्तांचे श्रद्धास्थान असून त्यांचे धार्मिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे विक्री केंद्रात पूजा साहित्याची विक्री करताना पूर्णतः पावित्र्य राखून आणि शनिदेवाचे मनोभावे स्मरण करूनच सेवा द्यावी. निविदाधारकाने दररोज शनिदेवाच्या प्रतिमेचे पूजन करणे तसेच भाविकांशी अत्यंत नम्रतेने व सौजन्याने वागणे बंधनकारक असेल. या सर्व अटींच्या पालनाबाबतचे प्रतिज्ञापत्र/प्रमाणपत्र पात्र निविदाधारकाने सादर करणे आवश्यक राहील.

३४.अग्निशमन यंत्रणा: प्रत्येक गाळेधारकाने स्वतःच्या खर्चाने अग्निशमन यंत्र (Fire Extinguisher) ठेवणे अनिवार्य राहील.

३५.सुरक्षेच्या दृष्टीने गाळेधारकाने स्वतःच्या गाळ्यात आणि गाळ्याच्या बाहेरील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे अनिवार्य राहील, ज्याचा एक्सेस (Access) वेळप्रसंगी देवस्थान प्रशासनाला उपलब्ध करून द्यावा लागेल.

३६.दलाल प्रथा: गाळेधारकाने किंवा त्यांच्या कर्मचाऱ्यांनी भाविकांना विशिष्ट सेवेसाठी किंवा दर्शनासाठी जबरदस्ती करणे, रस्ता अडवणे किंवा दलाली करणे यावर पूर्ण बंदी असेल.

३७.अनधिकृत जाहिराती: गाळ्याच्या दर्शनी भागात किंवा देवस्थानच्या भिंतींवर देवस्थानच्या परवानगीशिवाय कोणत्याही खाजगी कंपनीच्या जाहिरातींचे फलक लावता येणार नाहीत.

३८.व्यवसायाचे/गाळयाचे बाबतीत काही वाद उपस्थित झाल्यास त्या बाबतचे न्यायालयीन कामकाज नेवासा न्यायालयाचे कार्यकक्षेत असेल.

३९.व्यवसाय करताना केंद्र/राज्य अथवा स्थानिक प्रशासन यांचेव्दारा निर्गमित करण्यात आलेले कायदे, नियम अथवा इतर कोणतेही निर्देश यांचे पालन करणे निविदाधारक यांना बंधनकारक असेल.

४०.कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न दाखवता नाकारण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार देवस्थानचे संस्थेने राखून ठेवलेला आहे.

४१.निविदा अर्ज भरणारांनी निविदा अर्ज भरण्यापुर्वी खालील गाळयांचा तपशिल अगोदर वाचुन निविदा अर्ज भरावा.

**-: गाळयांचा तपशील :-**

सदर गाळयांच्या खालील तपशिला प्रमाणे ज्या किमान रकमा दर्शविलेल्या आहेत त्या पेक्षा अधिक रकमेचा निविदा अर्ज भरणे आवश्यक आहे.या पेक्षा कमी रकमेचा निविदा अर्ज नाकारण्यात येईल.

| अ.नं. | गाळा नंबर | किमान रक्कम (अंकी) | किमान रक्कम (अक्षरी) |
|---|---|---|---|
| 1 | 4 | 8,00,000.00 | आठ लाख |
| 2 | 6 | 8,00,000.00 | आठ लाख |
| 3 | 15 | 50,00,000.00 | पन्नास लाख |
| 4 | 34 | 15,00,000.00 | पंधरा लाख |

स्थळ : शनि शिंगणापूर
दिनांक : १८ जुलै २०२६

अतुल चोरमारे
कार्यकारी अधिकारी
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्थ व्यवस्था (शिंगणापूर)
ता.नेवासा,जि.अहिल्यानगर

## <u>परिशिष्ट “ अ “</u>

## <u>निविदा धारकाबाबतची माहिती</u>

१. फर्मचे/संस्थेचे नाव ---------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवरासाठी संपूर्ण पत्ता-----------------------------------------------------------------

3. दूरध्वनी क्रमांक-------------------------------------------------------------

कार्यालय-------------------------------------------------

निवास-------------------------------------------------

फॅक्स नंबर-----------------------------------------------

ई-मेल-------------------------------------------------------

४. संपर्क साठी व्यक्तीचे नाव--------------------------------------------------------------

दूरध्वनी क्रमांक -------------------------------------------------------------------

५. मालकाचे /भागीदारांची नावे  १ -------------------------------------------------------

२.-------------------------------------------------------

निविदा  धारकाचे नाव  ---------------------------------------

निविदा  धारकाची स्वाक्षरी---------------------------------------

**शिक्का**

**<u>परिशिष्ट “ ब “</u>**

**<u>तांत्रिक निविदेमधील कागदपत्रे (चेक लिस्ट )</u>**

१) मतदान ओळखपत्र/आधारकार्ड / ड्राईव्हींग लायसेन्स या पैकी एकाची झेरॉक्स

२) पॅन कार्डची प्रमाणित प्रत.

३) कोणत्याही संस्था / शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्था यांच्या काळ्या यादीमध्ये समाविष्ट नसल्याचे लेखी प्रतिज्ञापत्र.

४) अद्यावत दुकान नोंदणी दाखला (शॉप अॅक्ट) / उद्यम आधार परवाना विहित पद्धतीने प्राप्त करून घेऊन सादर करणे बाबत प्रमाणपत्र.

५) श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे बंधपत्र

६) शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असल्याचे हमीपत्र

**निविदाधारकाचे नाव व स्वाक्षरी**

**शिक्का**

**<u>परिशिष्ट “ क “</u>**

**<u>दरा संबधी लिफाफा</u>**

दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या कालावधी साठीची पुजा साहीत्य विक्री व इतर व्यवसायासाठी अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास देणेसाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| सदर गाळया मध्ये करावयाच्या व्यवसायाचे स्वरूप | गाळा नंबर | अकरा महीन्याच्या कालावधी करिता गाळा वापरासाठी एक रकमी परवाना शुल्क देवू इच्छितात ती रक्कम अंकी. |
|---|---|---|
| पुजा साहीत्य विक्री व इतर व्यवसाय | | रूपये – |

मंजुर निविदा धारकास त्यांनी परिशिष्ट “ क “ मध्ये नमुद केलेल्या परवाणा शुल्क रकमेवर सरकारी नियमानुसार होणारी (GST) जीएसटी १८ % अथवा अनुज्ञेय कराची रक्कम अतिरीक्त भरणा करावी लागेल.

निविदा धारकाचे नाव-----------------------------------------------------------

सही -------------------------------------------

दिनांक - / /२०२६

<u>**परिशिष्ट " ड "**</u>

**स्वयंघोषणा पत्र**

मी निविदाधारक ---------------------------------------------------------------------------------स्वत: प्रमाणित करतो कि मी स्वत: साठी अगर निविदाधारकासाठी कुणीही, कोणत्याही स्वरूपाचा, कोणत्याही कारणास्तव संस्थानचे विरोधात दावा/अर्ज कोणत्याही न्यायालयात प्रलंबित नाही तसेच निविदा धारकाचे नाव संस्थांनचे काळ्या यादीत समावेश नाही.जरी संस्थान विरोधात दावा दाखल केलेला असल्यास सदर निविदाधारकांच्या निविदेचा विचार करण्यात येणार नाही याची मला पूर्ण जाणीव आहे.

निविदा धारकाचे नाव-------------------------------------------------------------

सही ---------------------------------------------

दिनांक -     /       /२०२६

**<u>परिशिष्ट " इ "</u>**

**श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) यांना निविदा धारकाने द्यावयाचे बंधपत्र**

---

दिनांक : ____

प्रति,
मा. कार्यकारी अधिकारी,
श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर),
ता. नेवासा , जि. अहिल्यानगर

विषय : श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा अहिल्यानगर यांच्या मालकीच्या मौजे शिंगणापूर गट नं.२६० मधील व्यापारी संकुलातील गाळे पुजा साहीत्य/इतर दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या अकरा महीन्याच्या कालावधीसाठी परवाना पध्दतीने अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास देणे करिता निविदा बाबत.

महोदय,

मी / आम्ही खालीलप्रमाणे सही करून लिहून देतो / देतो की, वरील विषयासंबंधी आपण प्रसिद्ध केलेल्या निविदेतील सर्व अटी व शर्ती मी / आम्ही वाचलेल्या असून त्या मला / आम्हाला पूर्णतः मान्य आहेत. आपले अटी व शर्ती पालन करावयाचे मी / आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी / आम्ही आपणास निविदेत नमूद केले प्रमाणे श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) ता.नेवासा अहिल्यानगर यांच्या मालकीच्या मौजे शिंगणापूर गट नं.२६० मधील व्यापारी संकुलातील गाळे पुजा साहीत्य/इतर व्यवसायासाठी दिनांक २९.०७.२०२६ ते दिनांक २८.०६.२०२७ या अकरा महीन्याच्या कालावधीसाठी परवाना पध्दतीने अकरा महिन्याच्या कराराने चालविण्यास घेणे करिता हमी देतो. तसेच सदर गाळया चा वापर अनुज्ञेय नसलेले उद्योग व्यवसाय, सेवा तसेच कोणत्याही प्रकारचे अनैतिक,अधार्मिक अथवा देवस्थानच्या प्रतिमेला हाणी पोहचवणारा कोणताही व्यवसाय अथवा सेवा यासाठी करणार नाही. माझ्याकडे देवस्थानचा गाळा/जागा/व्यवसाय इ.ची थकबाकी स्वत:चे नावावर किंवा एकत्रित कुटूंबातील घटकाचे नावे नाही.

निविदा मान्य झालेनंतर अनुज्ञेय व्यवसाय बाबत शॉप act परवाना/ उद्यम आधार परवाना तत्काळ सादर करण्यात येईल व माझी/आमची सादर केलेली गाळे पुजा साहीत्य/इतर व्यवसायासाठी ची निविदा मंजूर झाल्यास ७ दिवसाच्या आत शासनाने निश्चित केलेल्या नुसार करारनामा करून देऊ व परवाना शुल्क ११ महिन्याची एकूण रक्कम डी.डी. व्दारे संस्थांनकडे जमा करणे विषयांकित मंजूर निविदा दराने रक्कम भरणा करणे माझेवर/ आमच्यावर बंधनकारक राहील त्यात कसूर झाल्यास होणाऱ्या शिक्षेस मी/ आम्ही पात्र राहू असे बंधपत्र देत आहे/ आहोत.

आपला/ आपली विश्वासू

फर्म मालकाचे नावे — सही व शिक्का.

(१)--------------------------------------------------------

(२)--------------------------------------------------------

**<u>परिशिष्ट " ई "</u>**

**<u>शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था असल्याचे हमीपत्र</u>**

**प्रति,**
**मा. कार्यकारी अधिकारी,**
**श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर),**
**ता. नेवासा , जि. अहिल्यानगर**

मी, श्री/सौ/श्रीमती ________________________________________________ (निविदाधारकाचे नाव), राहणार ______________, याद्वारे खालीलप्रमाणे लेखी हमी/प्रमाणपत्र देतो की:

१. माझी आणि माझ्याकडे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची श्री शनिदेवावर पूर्ण श्रद्धा, भक्ती आणि आस्था आहे.

२. देवस्थानच्या गाळ्यात पूजा साहित्याची विक्री/इतर व्यवसाय/सेवा देताना आम्ही श्री शनिदेवाचे धार्मिक महत्त्व आणि भक्तांच्या भावनांचा पूर्ण आदर राखू.

३. गाळ्यामध्ये पूजा साहित्याची विक्री/इतर व्यवसाय/सेवा देताना संपूर्ण पावित्र्य राखले जाईल आणि व्यावसायिक हेतू सोडून मनोभावे व सेवाभावी वृत्तीने कार्य केले जाईल.

४. गाळ्यामध्ये दररोज श्री शनिदेवाच्या प्रतिमेचे विधीवत पूजन केले जाईल.

५.दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांशी मी स्वतः आणि माझे सर्व कर्मचारी अत्यंत नम्रतेने, सौजन्याने आणि आदराने वागतील याची मी पूर्ण जबाबदारी घेत आहे. भाविकांच्या तक्रारीस कोणताही वाव राहणार नाही, याची दक्षता घेतली जाईल.

६. देवस्थानने घालून दिलेल्या सर्व धार्मिक आणि प्रशासकीय नियमांचे मी काटेकोरपणे पालन करेन.

उपरोक्त माहिती आणि अटींचे उल्लंघन झाल्यास, माझा परवाना रद्द करण्याचा किंवा देवस्थान प्रशासनाकडून होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी पात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

दिनांक: / /२०२

स्थळ:

निविदाधारकाची सही: ________

निविदाधारकाचे नाव: _________

मोबाईल क्रमांक: __________

(शिक्का)